**<u>नियमावली क्र. 04</u>**

## <u>निर्णय घेणे, देखरेख आणि जबाबदारी यासाठी अवलंबिण्यात येणारी पध्दत</u>

प्रशासकिय आणि कर्मचारी विषयक बाबींमध्ये अधिष्ठाता हे त्यांना देण्यात आलेल्या अधिकारात निर्णय घेतात आणि अधिष्ठाता यांच्या मंजुरीच्या अधिकाराच्या कक्षेबाहेरील प्रकरणांच्या बाबतीतील प्रस्ताव संचालक (वै.शि. व प्र.रु)/अतिरिक्त आयुक्त/ महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे सादर करण्यात येतात. कोणत्याही प्रकारच्या शुल्कामध्ये झालेली वाढ, एखादा नवीन उपक्रम सुरु करणे, एखादा युनिट, सेवाकालावधीच्या वेळेतील बदल इत्यादी बाबीं जनतेपर्यत पाहोचविण्यासाठी सदर माहिती सुचना फलकावर प्रदर्शित करण्यात येते किंवा वृत्तपत्र, वेबसाईट आणि शक्य झाल्यास दूरदर्शनवर प्रसारीत करण्यात येते.